IIPIMRJ | IIP International Multidisciplinary Research Journal

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# ई-साहित्य: उदयन्मुख प्रकार आणि नवीन आव्हाने

**[1]पुरुषोत्तम बाबासाहेब वाकडे, [2]डॉ.संजय लक्ष्मण भेदेकर**

ग्रंथपाल,कला व वाणिज्य महाविद्यालय ,सातारा

ग्रंथपाल, महिला महाविद्यालय गेवराई

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 19th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

ई-साहित्य,
उदयन्मुख प्रकार,
नवीन आव्हाने

**ABSTRACT**

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये ई-साहित्य म्हणजे काय त्याचे स्वरूप संकल्पना, ई-साहित्याचे प्रचलित व उदयन्मुख प्रकार व नवीन आव्हाने ज्यात कॉपीराईट कायद्याचे उल्लंघन ,सृजनशीलतेचा अभाव , ई-साहित्य वापरातील अडचणी ,भाषिक असमानता ,ई-साहित्याचे जतन दस्तऐवजीकरण यांचे विश्लेषण केले आहे . ई-साहित्यापुढील नवीन आव्हाने व उपाय सुचवले आहेत .

***Plagiarism Check Report:***
Tool Used: Turnitin
Date of Report: Dec 18, 2025
Similarity Index: 5%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Wakde, P. B., & Bhedekar, S. L. (2025). **ई-साहित्य: उदयन्मुख प्रकार आणि नवीन आव्हाने.** IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ), 2(IV), pp. 894–899.

**प्रस्तावना –**

आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे जग झपाट्याने बदलत आहे.तंत्रज्ञानाचा सर्वच क्षेत्रावर परिणाम झाला आहे.हा बदल साहित्य क्षेत्रातही झाला आहे.डिजिटल साधनामुळे ज्यात स्मार्टफोन, टॅबलेट, ई-बुक रीडर यामुळे वाचन व लेखनाच्या स्वरूपात अमुलाग्र बदल झाले आहेत,ई-साहित्य जे प्रारंभिक अवस्थेत होते त्याच्या स्वरुपात बदल होऊन ते अधिकाधिक संवादात्मक व वापरकर्त्याभिमुख झाले आहे. ब्लॉग, ई-बुक्स, ऑनलाइन कथा, कादंबऱ्या आणि इंटरॅक्टिव्ह साहित्य यासारखे उदयन्मुख प्रकार निर्माण झाले आहेत. ई-साहित्यामुळे लेखन व वाचन क्षेत्रात क्रांती घडवून आणली असली तरी अनेक नवीन आव्हाने देखील निर्माण झाली आहेत.कॉपीराईट कायद्याचे उल्लंघन ,सृजनशीलतेचा अभाव , साहित्य ई-स्वरुपात हातात आले असले तरी वाचक वाचनापासून दूर जात आहे ,भाषिक असमानता ,ई-साहित्याचे जतन दस्तऐवजीकरण अशी अनेक आव्हाने उभी राहिली आहेत.

**ई-साहित्य संकल्पना - ODLIS (ऑनलाइन ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शब्दकोश)** नुसार, संगणकाद्वारे वाचन आणि प्रक्रिया करण्यासाठी तयार केलेला, डेटा किंवा संगणक प्रोग्राम यांचा समावेश असलेले साहित्य, जे संगणकाला जोडलेल्या उपकरणांच्या मदतीने किंवा इंटरनेटसारख्या नेटवर्कद्वारे दूरस्थपणे वापरले जाऊ शकते. यामध्ये **सॉफ्टवेअर,** इलेक्ट्रोनिक मजकूर ,ग्रंथसूची डेटाबेस ई. चा समावेश होऊ शकतो यास ई-साहित्य असे म्हणतात .

**ई-साहित्य स्वरूप** –

१. **मजकूर आधारित** - या ई-साहित्यामध्ये केवळ मजकूर असतो यात ध्वनी ,व्हिडीओ यांचा समावेश नसतो ,याचे pdf किंवा word स्वरूप असते.यात ई-बुक्स,ई-जर्नल समावेश होतो .

उदा .शोधगंगा, गुगल बुक्स ई.

२. **डेटाबेस**– यामध्ये माहितीचा संग्रह हा विषयनुसार असतो.या स्वरूपातील ई-साहित्य संशोधकासाठी महत्त्वपूर्ण असतात व कीवर्ड्स नुसार माहितीचा शोध घेणे सोपे असते.

उदा . Web of Science , Scopus

३. **मुक्त स्वरूपातील ई-साहित्य** – या ई-साहित्यासाठी कोणतेही शुल्क लागत नाही व असे साहित्य सर्व समाजापर्यंत जाते.यामध्ये ई-जर्नल, ई-बुक्स यांचा समावेश होतो.

उदा . NDL, DOAJ

४. **वेब-आधारित** – या ई-साहित्यामध्ये विविध विषयावरील सखोल माहिती असते व अशी ई-साहित्य संबंधित अद्यावत माहिती देतात. यामध्ये ब्लॉग्स, वेबसाइट्स, पोर्टल्स, यांचा समावेश होतो

उदा . Wikipedia, Research Gate

५. **मल्टिमीडिया** – या ई-साहित्यामध्ये मजकूराबरोबर व्हिडिओ, ध्वनी, चित्र, यांचा वापर केला जातो ई-लर्निंग व प्रशिक्षणासाठी उपयोग केला जातो.

उदा . स्वयंम, Coursera इ.

६. **Interactive E-Resources** – यामध्ये संवादात्मक बाबीचा समावेश होतो ,आजच्या काळात या ई-साहित्य स्वरूपाचा प्रभाव जास्त पडलेला दिसून येतो

उदा. Virtual Labs, Moodle Learning System

७. **कृत्रिम बुद्धिमत्ता** – यामध्ये ई-साहित्य अधिक वाचककेंदी झाले आहे. व वाचकाच्या अभिरुची, आवड लक्षात घेऊन साहित्य पुरवण्याचे काम यामध्ये होते .

उदा. Semantic Scholar, Scite.ai,

थोडक्यात ई-साहित्याचे स्वरूप पाहिल्यानंतर असे लक्षात येते कि आजच्या काळात ई- साहित्य अधिकाधिक वाचककेंदी झाले आहेत .

- **ई-साहित्याचे साधारणतः खालील प्रमाणे प्रकार पडतात**

**अ.)ऑनलाईन** – यामध्ये ई-बुक्स,ई-जर्नल, ई-मॅगझिन्स, ई-थिसिस, ऑनलाइन डेटाबेस, वेबसाईट्स आणि पोर्टल्स, इलेक्ट्रॉनिक वृत्तपत्रे हे प्रकार पडतात .

**ब .)ऑफलाईन** - सीडी-रॉम डेटाबेस , डीव्हीडी-रॉम डेटाबेस.

- **ई-साहित्याचे उदयन्मुख प्रकार आणि माध्यम**

**१. ऑडिओबुक्स आणि पॉडकास्ट साहित्य** – साहित्य प्रकारातील कथा,कविता , कादंबऱ्या या श्राव्य माध्यमाद्वारे अनुभवण्याची ही आधुनिक प्रवृत्ती आहे. यामध्ये आपले दैनंदिन काम करत आपण साहित्य ऐकू शकतो,या साहित्याचा दिव्यांग व्यक्तीसाठी जास्त उपयोग आहे , श्रवणशील संस्कृतीत वाढ झाल्यामुळे या प्रकारास महत्त्व आले आहे . स्टोरीटेल, कुकू एफएम सारखे ऑडिओबुक्स अँप मोबाईल मध्ये आले आहेत ,ज्यांचा वाचक वर्ग वाढत आहे. या ई-साहित्याच्या उदयन्मुख प्रकारची वाढ होत असताना दिसत आहे . पॉडकास्ट हे वाचण + संवाद यांचे मिश्रण आहे.

**आव्हाने** – ध्वनी मुद्रण गुणवत्ता, कॉपीराईट प्रश्न, आर्थिक निकष, प्रादेशिक व भाषिक असमतोल, एकाग्रतेचा अभाव व समीक्षण व साहित्यिक मूल्यमापन करणे कठीण. हि नवीन आव्हाने आहेत

२. **ब्लॉग्स -** उदयन्मुख प्रकारामधील ब्लॉग्स हा एक महत्त्वपूर्ण प्रकार आहे. **ब्लॉग (Blog)** हा शब्द *"Weblog"*या इंग्रजी संज्ञेपासून तयार झाला आहे, ज्याचा अर्थ "वेबवरील नोंदवही असा होतो. ब्लॉग हे इंटरनेटवरील असे व्यासपीठ आहे जिथे व्यक्ती, संस्था किंवा समूह आपले विचार, अनुभव, संशोधन, मतमतांतरे किंवा माहिती नियमितपणे प्रकाशित करतात. ब्लॉगिंगमुळे लेखकाला स्वातंत्र्यपूर्ण व्यासपीठ मिळते .विविध साहित्यप्रकार ज्यात कथा ,कविता , कादंबरी या ब्लॉग्सच्या माध्यमातून प्रकाशित होत असतात. मराठी ब्लॉगविश्वात 'मनोगत', 'मराठी ब्लॉगस्पॉट''मायबोली' यांसारख्या मंचांनी अनेक लेखक घडवले. ब्लॉग्सच्या माध्यमातून लेखकाला वाचकाशी थेट संवाद साधने शक्य होते .

**आव्हाने -** सोशल मिडिया स्पर्धा ,कॉपीराईट ,गुणवत्ता नियंत्रणाचा अभाव,भाषिक तांत्रिक मर्यादा व आर्थिक आव्हाने .

**३. सोशल मीडियावरील साहित्य** – यामध्ये आधुनिक काळात सर्वात लोकप्रिय ई-साहित्य माध्यम म्हणजे सोशलमिडिया यात इन्स्टाग्राम, एक्स, फेसबुक, युट्यूब या माध्यमावर ई-साहित्याचा नवा प्रवाह निर्माण झाला आहे . सोशल मीडियावर लेखकाला

तत्काळ प्रतिसाद मिळतो.यामुळे संवादात्मक साहित्यनिर्मिती शक्य झाली आहे ,व आज विद्यार्थी आपला बराच वेळ सोशल मीडियावर घालत आहे ,त्यामुळे ई-साहित्याचा हा प्रकार प्रभावशाली आहे . साहित्याची लोकशाही आणि समकालीनता वाढविण्यात या माध्यमांचा मोठा वाटा आहे.

**आव्हाने** – क्षणभंगूरता,सृजनशीलतेचा अभाव व कॉपीराईट उल्लंघन ,ट्रोलिंग टीका व मानसिक दबाव ,सामाजिक नैतिक जबाबदारीचा अभाव, गुणवत्ता नियंत्रण अभाव .

४. **विकीज -** विकी" (Wiki) हा शब्दचा अर्थ "जलद" किंवा "त्वरित" असा आहे. विकी म्हणजे अशी वेबसाइट किंवा ऑनलाईन प्रणाली जिथे कोणताही अधिकृत वापरकर्ता नवीन माहिती जोडू शकतो.या स्वरूपातील लेखनामुळे सर्जनशीलतेची वाढ झाली आहे व या तंत्रज्ञानामुळे साहित्यिक मजकुराचे एकत्रित लेखन, संपादन आणि पुनर्रचना शक्य झाली आहे. यामध्ये एकच लेखक नसून अनेक लेखक एकत्रितपणे एकच साहित्य तयार करत असतात .व यामुळे पारंपारिक वाचक-लेखक नात्याला नवी दिशा मिळाली आहे .विकीजचा उपयोग ई-साहित्यामध्ये कादंबरी,कविता.ज्ञानकोश तयार करण्यासाठी होत आहे तर विद्यापीठांमध्ये संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे लेखन व माहिती शेअरिंगसाठी वापरले जाणरे विकी प्लॅटफॉर्म हे याचे उदाहरण आहे.मराठी साहित्यात 'मराठी विकिपीडिया' पासून या साहित्याची सुरुवात झाली .थोडक्यात विकीज हे ई-साहित्याचे एक प्रभावी व सामुहिक स्वरूप आहे.यामुळे साहित्याचा केंदबिंदू एकच लेखक पासून सहलेखक याकडे जात असताना दिसतो.भविष्यात शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात विकीज हे प्रभावी ठरेल .

**आव्हाने** – बौद्धिक मालकी हक्क,साहित्यातील अस्थिरता,नैतिकता व विश्वसनीयता इ.

५. ***हायपरटेक्स्ट*** **-** ही संकल्पना अमेरिकन संशोधक *थिओडोर नेल्सन* यांनी *१९६०* मध्ये मांडली.

*हायपरटेक्स्ट हे ई-साहित्याचे अतिशय प्रगत रूप आहे*, या प्रकाराने "एक लेखक–एक वाचक" या पारंपरिक समीकरणाला छेद दिला आहे व "अनेक लेखक–अनेक वाचक–अनेक मार्ग" अशी नवी संकल्पना मांडली आहे. हायपरटेक्स्ट म्हणजे असे डिजिटल साहित्य ज्यात वाचकाला साहित्यातील विविध दुव्यांवर क्लिक करून पुढील भाग वाचण्याची, बदलण्याची किंवा नवी माहिती उघडण्याची संधी असते .मुद्रित साहित्यामध्ये लेखकाने ठरवलेल्या क्रमाने वाचक साहित्य वाचतो परंतु यामध्ये वाचक कथानकाचा मार्ग स्वतः ठरवतो .१९९० नंतर *हायपरटेक्स्ट कथा ,कादंबऱ्या ,लेख तयार झाले .मायकेल जॉयस यांची "Afternoon: A Story" (१९८७)* ही जगातील पहिली प्रसिद्ध हायपरटेक्स्ट कादंबरी . मराठी साहित्यात लेखकांनी ब्लॉग आणि वेबसाईटच्या माध्यमातून *"संवादात्मक कथा"* या प्रकारात हायपरलिंकचा वापर करून प्रयोग केले आहेत.

**आव्हाने** – वाचकाचा अतिरेकी सहभाग ,तांत्रिक ज्ञानाचा अभाव,साहित्यिक सलगतेचा अभाव ,सृजन प्रक्रियेतील गुंतागुंत ,समीक्षण /मूल्यमापन कठीण

- **ई-साहित्याचे उदयन्मुख प्रकार व त्यापुढील नवीन आव्हाने -**

ई-साहित्याला नवीन उदयन्मुख प्रकार दिशा देत असले तरी तांत्रिक ,नैतिक आव्हाने आली आहेत –

**१. नैतिक व सामाजिक आव्हाने –**

-कॉपीराईट व बौद्धिक संपदा हक्क यांचे उल्लंघन वाढले आहे

-वांग्मय चौर्य मोठ्या प्रमाणात

-खोट्या माहितीचे प्रसारण त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडले

२. **तांत्रिक आव्हाने** –

- विविध प्लॅटफॉर्मवर साहित्य सुसंगत ठेवणे कठीण.

- वाचकांना तांत्रिक ज्ञानाचा अभाव (माहितीची निरक्षरता )

- भाषिक व तांत्रिक आव्हाने

- नवीन तंत्रज्ञान (AI, VR, AR) आल्याने जुनी साहित्यिक सामग्री अप्रचलित ठरते.

३.**साहित्यिक व सृजनशील आव्हाने** –

-कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे सृजनशीलता कमी होत चालली

- वेग व संवाद यांना महत्त्व सखोलता कमी होत चालली

- लेखन तात्कालिक

- भावनात्मकता व रचनात्मकता कमी

४. **समीक्षण/मुल्यांकन कठीण**

- ई-साहित्याला पारंपारिक निकष लागू होत नाहीत

- नवीण आलेले ई-साहित्य सामिक्षनाचे निकष तयार नाहीत

५. **आर्थिक आव्हाने** –

-ई-साहित्य निर्मिती ,व संपादन व वितरण यासाठी खर्च जास्त

-डिजिटल संग्रह यासाठी निधीचा अभाव

६. **वाचन संस्कृती पुढील आव्हाने**

- वाचकांचा लक्षकेंद्रित कालावधी कमी होत चालला

-दीर्घ लेखन कमी होत चालले

- विचारमंथनाची सखोलता कमी

-वाचनाचे स्वरूप बदलले

७. **संवर्धन व संग्रह** –

- ई-साहित्याच्या बदलत्या स्वरूपामुळे संग्रह कठीण

-ब्लॉग्स ,सोशल मिडिया बंद झाल्यास साहित्य नाहीसे

-भविष्यात प्राथमिक स्त्रोत संशोधानासाठी राहणार नाही

● **निष्कर्ष व सूचना –**

ई-साहित्य हे आधुनिक समाजातील सर्जनशीलतेचे प्रभावी माध्यम असले तरी त्याची **शाश्वतता, विश्वसनीयता आणि शैक्षणिक स्वीकार्यता** अनेक आव्हानांशी निगडित आहे.

वरील सर्व आव्हानावर मात करण्यासाठी खालील उपाय करणे गरजेचे आहेत -

**सूचना** –

- कॉपीराईट कायद्याची प्रभावी अमलबजावणी करणे यासाठी व्यापक स्तरावर जाणीव जागृती करावी
- डिजिटल सुरक्षासाठी धोरण असावे
- ई-साहित्याचे केंद्रीकृत संग्रहण (National Digital Literary Archive) तयार करणे.
- ई-साहित्य समीक्षण व प्रशिक्षणासाठी विद्यापीठांत स्वतंत्र विभाग स्थापन करणे.
- विद्यापीठांत ई-साहित्य समीक्षण व प्रशिक्षणासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करावा
- ई-साहित्याच्या संवर्धनासाठी स्वतंत्र संस्था स्थापन करावी
- प्रादेशिक भाषांतील ई-साहित्याला तांत्रिक प्रोत्साहन द्यावे .
- अभ्यासक्रमात ई-साहित्याचा समावेश करावा .
- गुणवत्तापूर्ण ई-साहित्य निर्मितीसाठी प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन.

**संदर्भ –**

१. जोशी, संजय (२०१९). *डिजिटल साहित्य आणि आधुनिक वाचन संस्कृती.* पुणे : साकेत प्रकाशन.

२. पाटील, रमेश (२०२१). *ई-साहित्य : नवे संदर्भ आणि आव्हाने.* मुंबई : प्रतिमा प्रकाशन.

३. कुलकर्णी, मंगला (२०२०). *मराठी ई-साहित्य : विकास आणि दिशा.* नागपूर : विद्या प्रकाशन.

४. शिंदे, माधवी (२०२३). *इलेक्ट्रॉनिक साहित्याचा सामाजिक प्रभाव.* नाशिक : सावित्री पब्लिकेशन.

५. इलेक्ट्रॉनिक लिटरेचर ऑर्गनायझेशन (२०२३). *ई-साहित्य म्हणजे काय?* संकेतस्थळ : https://eliterature.org/